महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक कार्यालय,वाशिम.
काटा रोड सिव्हील लाईन वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834
ईमेल: - sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेस नोट

## बुस्टर डोस साठी कॉल आल्यास सावधान

कोरोनाचा नविन ओमायक्रॉन व्हेरीएंट आल्यानंतर शासनाने बुस्टर डोस देण्याबाबत घोषणा केल्यानंतर सायबर गुन्हेगारीत सक्रीय असलेल्या भामटयांनी फ्री बुस्टर व्हॅक्सीनेशन करीता टेलीफोन कॉल करून फ्री बुस्टर डोस ची प्रलोभने देण्यास सुरूवात केली आहे.नागरीकांनी अशा फसवणुकीला बळी न पडता सावधगीरी बाळगण्याचे आवाहन वाशिम जिल्हा पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री बच्चन सिंह यांनी केले आहे.

कॉल करणारा व्यक्ती (सायबर गुन्हेगार) नागरीकांना दोन्ही व्हॅक्सीनेशन पुर्ण झाल्या आहेत असे सांगत त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी दोन्ही व्हॅक्सीनेशन कधी करून घेतले आहे त्याच्या तारखा आणि केंद्राचे नाव याची माहीती सांगतो. आणि तीसरा डोस घेण्यासाठी स्वारस्य आहे का असे विचारून तीसरा डोस घेण्याकरीता आपण या फोन कॉलवर नोंदणी करू शकता जेनेकरून जानेवारी किंवा फेब्रुवारी महीण्यात तुम्हाला हा बुस्टर डोस देण्यात येईल,असे सांगीतले जाते त्यानंतर मोबाईलवर एक ओटीपी येतो व लगेच एक कॉल येवुन त्यावरून ओटीपी ची मागणी केली जाते आणि ओटीपी देताच खात्यातुन रक्कम ऑनलाईन चोरी केली जाते.

कुठल्याही प्रलोभनांना बळी न पडता ओटीपी शेअर करू नये व ऑनलाईन फ्रॉड झाल्यास सकाळी १० ते सायंकाळी ०६ दरम्यान १५५२६० या हेल्पलाईन वर कॉल करण्याचे आवाहन यादवारे पोलीस अधीक्षक श्री बच्चन सिंह यांनी केले आहे.

पोलीस निरीक्षक
सायबर पोलीस स्टेशन,वाशिम

Scanned with CamScanner